कार्यालयीन टिपणी

स्थापत्य EWS प्रकल्प विभाग
दि.14 /09/२०२०

विषय :- केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी चऱ्होली, रावेत, बोऱ्हाडेवाडी प्रकल्पांचे अर्ज प्रक्रियेस मुदतवाढ घेणेबाबत.

संदर्भ :- मा.सौ.उषा उर्फ माई मनोहर ढोरे, महापौर, पिं.चिं.म.न.पा. यांचेकडील पत्र क्र.महापौर/कावि/९९१/२०२०, दि.०९/०९/२०२०.

मा.स.सादर,

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी चऱ्होली, रावेत व बोऱ्हाडेवाडी येथे स्वस्त घरकुल योजना राबविण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भान्वये मा.महापालिका सभा ठराव क्र.५१९, दि.२६/०२/२०२० अन्वये केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चऱ्होली, रावेत व बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पांसाठी लाभार्थी, लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणे प्रक्रियेस मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन सदर प्रकल्पांसाठी नागरीकांकडून अर्ज मागविणेची प्रक्रिया चालू केलेली आहे. सद्यस्थितीत सदर प्रक्रियेची मुदत दि.१७/०९/२०२० पर्यंत आहे.

उपरोक्त संदर्भान्वये मा.सौ.उषा उर्फ माई मनोहर ढोरे, महापौर यांनी कोरोना विषाणूचे संकट व लॉकडॉऊनमुळे नागरीकांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. तसेच सदर योजनेकरिता अर्ज भरताना नागरीकांना आवश्यक कागदपत्रे व रु.रु.५,०००/- चा डी.डी. जमा करताना अडचणी येत असल्याने पुढील १५ दिवस (दि.०२/१०/२०२० पर्यंत) मुदतवाढ देणेबाबत मागणी केलेली आहे. अ'

तरी सदर प्रक्रियेची मुदत दि.०२/१०/२०२० पर्यंत वाढविणेचा प्रस्ताव मान्य असलेस स्वाक्षरीकामी सविनय सादर.

उपअभियंता
PMAY प्रकल्प विभाग

कार्यकारी अभियंता
PMAY प्रकल्प विभाग

• वर्तमान पत्रात प्रसिद्धी द्यावी.
• सर्व नगर सदस्यांना कळविणेत यावे.

14/09/2020
सह शहर अभियंता
PMAY प्रकल्प विभाग

'अ' प्रमाणे शिफारस करणेत येत आहे.

सक्षम प्राधिकारी तथा सह.आयुक्त
झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

मा.आयुक्त
पिं.चिं.म.न.पा.

Scanned by CamScanner